जनमानसाचा निडर आवाज...

# पुणे प्राईम न्यूज

मुख्य संपादक : जनार्दन दांडगे

दैनिक | वर्ष १ | अंक १९१ | शनिवार, ३१ जानेवारी २०२६ | मूल्य : २ रु. | पाने : ४ | RNI NO - MAHMAR/2022/84210







## संक्षिप्त

### महाराष्ट्राला मिळाणार पहिल्या महिला उपमुख्यमंत्री

**मुंबई,ता. ३० :** महाराष्ट्राच्या राजकारणात आजवर कधी न घडलेली घटना उद्या घडण्याची शक्यता आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या सुनेत्रा पवार उद्या उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेणार असून, त्या महाराष्ट्राच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री ठरणार आहेत. या निर्णयामुळे राज्याच्या राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या गोटात गेल्या तासांत घडामोडींना प्रचंड वेग आला. उपमुख्यमंत्रिपदासाठी सुनेत्रा पवार यांच्या नावावर अंतिम शिक्कामोर्तब झाल्याची माहिती आहे. अजित पवार यांचे राजकीय सल्लागार नरेश अरोरा यांनी सुनेत्रा पवार यांच्याशी थेट चर्चा केली असून, त्यांनी ही जबाबदारी स्वीकारल्याचे समजते. त्यानुसार उद्या सायंकाळी शपथविधी होणार आहे. या निर्णयाआधी राष्ट्रवादीचे प्रमुख नेते छगन भुजबळ, सुनील तटकरे, धनंजय मुंडे आणि प्रफुल्ल पटेल यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांची वर्षा निवासस्थानी भेट घेतली. या बैठकीनंतरच उपमुख्यमंत्रिपदासाठी सुनेत्रा पवार यांच्या नावावर एकमत झाले असल्याचे संकेत मिळाले.

# कोरेगाव-मुळ पंचायत समिती गणातून कृषिराज चौधरी रणांगणात

## शेतकरी, महिला, युवकांचा विकास हाच अजेंडा

**उरुळी कांचन, ता. ३० :** जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राजकीय वातावरण तापू लागले असून, कोरेगाव-मुळ (ता. हवेली) पंचायत समिती गणातून राष्ट्रवादी काँग्रेसचे अधिकृत उमेदवार कृषिराज चौधरी यांनी जोरदार तयारीनिशी मैदानात उतरत विकासाचा स्पष्ट अजेंडा मतदारांसमोर ठेवला आहे. शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवणे, मूलभूत सुविधांचा विकास आणि युवक-महिलांना सक्षम करणे हाच आपल्या लढतीचा केंद्रबिंदू असल्याचे त्यांनी ठामपणे जाहीर केले आहे.

कृषिराज चौधरी यांना दीर्घकाळाचा राजकीय व सहकार क्षेत्रातील भक्कम वारसा लाभलेला आहे. त्यांच्या चुलते हनुमंत चौधरी यांनी तब्बल चार दशकांहून अधिक काळ या परिसरात शेतकऱ्यांसाठी नेतृत्व करत यशवंत सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमातून ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळ दिले. पथसंस्था



व सहकारी संस्थांच्या माध्यमातून शेतकरी व व्यावसायिकांना पतपुरवठा करून त्यांनी भागाच्या विकासाची मजबूत पायाभरणी केली. हाच वारसा पुढे वडील बाळू आप्पा चौधरी यांनी समर्थपणे पुढे नेत यशवंत सहकारी साखर कारखाना, थेऊर तसेच पंचायत समिती हवेली येथे काम करताना विकासाची गती कायम राखली.

उच्चशिक्षित असलेले कृषिराज चौधरी यांनी एमबीएचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर नोकरीचा अनुभव घेतला; मात्र समाजसेवेची ओढ त्यांना परत गावाकडे घेऊन आली. नायगाव सोसायटीच्या निवडणुकीत ते बिनविरोध निवडून येत चेअरमन झाले आणि या पदावर असताना शेतकऱ्यांच्या पीककर्ज, आर्थिक अडचणी व प्रशासकीय प्रश्नांना थेट हात घातला. याच अनुभवाच्या बळावर आता व्यापक पातळीवर काम करण्यासाठी त्यांनी हवेली पंचायत समितीची निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला आहे.

कोरेगाव-मुळ गणातील ज्वलंत प्रश्नांवर बोलताना चौधरी यांनी थेट बोट ठेवले. महामार्गालगत झपाट्याने वाढणाऱ्या शहरीकरणामुळे ड्रेनेज, रस्ते, पिण्याचे पाणी आणि पथदिवे या मूलभूत सुविधांचा बोजवारा उडाल्याचे वास्तव त्यांनी मांडले. हे प्रश्न केवळ कागदावर नव्हे तर प्रत्यक्ष जमिनीवर सोडवले जातील, असा ठाम इशाराच त्यांनी दिला. ग्रामीण व कृषिप्रधान भागात वाढलेल्या बिबट्या त्रासावर वन विभागाशी समन्वय साधून ठोस उपाययोजना राबवण्याचे आश्वासनही त्यांनी दिले.

महिला सक्षमीकरणाबाबत बोलताना चौधरी यांनी महिलांना केवळ लाभार्थी न ठेवता कुटुंबाचा आर्थिक कणा बनवण्याचा निर्धार व्यक्त केला. स्वयंरोजगार, प्रशिक्षण व आर्थिक सहाय्याच्या योजना प्रभावीपणे राबवण्यातयेतील,असेत्यांनीस्पष्टकेले.

तसेच बंद पडलेल्या यशवंत सहकारी साखर कारखान्याबाबत बोलताना, हा कारखाना पुन्हा सुरू करणे हेच आमचे ध्येय असून तो हवेली तालुक्याच्या विकासाचा केंद्रबिंदू बनेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

दरम्यान, आमदार माऊली कटके यांच्या मार्गदर्शनाखाली परिसराचा सर्वांगीण विकास करण्यासाठी मतदारांनी आपल्याला संधी द्यावी, असे आवाहन करत कृषिराज चौधरी यांनी, जनतेने दाखवलेल्या विश्वासाला कधीही तडा जाऊ देणार नाही अशी ठाम ग्वाही दिली आहे.

### स्थानिक पातळीवर रोजगारनिर्मितीवर भर देणार

पुणे प्राईम न्यूजशी संवाद साधताना कृषिराज चौधरी यांनी आपले विकासाचे स्पष्ट व्हिजन मांडले. पिण्याचे पाणी, ड्रेनेज, शेतीसाठी आवश्यक साहित्य-अवजारे यासाठी अनुदान, युवकांसाठी शिक्षण व रोजगाराच्या विशेष योजना राबवण्यात येतील, असे त्यांनी ठामपणे सांगितले. शिक्षणासाठी कुटुंबाने चार एकर जमीन विनामूल्य दान केल्याचा उल्लेख करत, भविष्यात शिक्षणासोबतच स्थानिक पातळीवर रोजगारनिर्मितीवर भर दिला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.



# शरद पवारांची नीरा नदीवर पाहणी; नेतृत्वाबाबत नवे संकेत

**बारामती, ता. ३० :** बारामतीच्या राजकारणात पुन्हा एकदा हालचालींना वेग आला असून, ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या अलीकडील कृतीमुळे राजकीय वर्तुळात विविध चर्चांना उधाण आले आहे. दीर्घकाळ बारामतीच्या दैनंदिन राजकारणापासून जाणीवपूर्वक अंतर ठेवणारे शरद पवार आता अधिक सक्रिय होत असल्याचे चित्र दिसत आहे.

गेल्या अनेक वर्षांत बारामतीतील प्रशासन, विकासकामे आणि स्थानिक प्रश्नांची जबाबदारी प्रामुख्याने अजित पवारांकडे होती. पाणी, शेती, उद्योग किंवा स्थानिक वाद अशा विषयांमध्ये शरद पवारांचा थेट हस्तक्षेप क्वचितच पाहायला मिळत होता. राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फुट पडल्यानंतरही त्यांनी बारामतीत प्रत्यक्ष भूमिका घेतली नव्हती, हे विशेष मानले जात होते.

मात्र अलीकडे परिस्थितीत बदल झाल्याचे संकेत मिळत आहेत. शरद पवार यांनी बारामती तालुक्यातील नीरा-वाघज येथे भेट देत नीरा नदीच्या प्रदूषणाची प्रत्यक्ष पाहणी केली. ही पाहणी केवळ पर्यावरणाशी संबंधित नसून, तिचे राजकीय अर्थही काढले जात आहेत. स्थानिक प्रश्नांवर स्वतः लक्ष घालण्याची ही भूमिका अनेकांसाठी आश्चर्यकारक ठरली आहे.

दरम्यान, बारामतीच्या भविष्यातील नेतृत्वाबाबतही चर्चा सुरू झाल्या आहेत. काही नेत्यांकडून वेगवेगळी नावे पुढे येत असताना, शरद पवारांच्या या सक्रियतेकडे बारामतीत पुन्हा लक्ष केंद्रीत करण्याचा संकेत म्हणून पाहिले जात आहे. नीरा नदीची पाहणी ही एक सुरुवात असून, बारामतीच्या राजकारणात नवा अध्याय सुरू होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# दिलीप वळसे पाटील थेट मुंबईकडे राष्ट्रवादी एकत्र येण्याच्या हालचालींना वेग?

**पुणे, ता. ३० :** राष्ट्रवादी काँग्रेसच्या गोटात पुन्हा एकदा हालचालींना वेग आला असून, मुंबईत सुरू असलेल्या घडामोडींमुळे राज्याच्या राजकारणात चर्चांना उधाण आले आहे. ज्येष्ठ नेते प्रफुल्ल पटेल यांचा फोन आल्यानंतर माजी सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील यांनी आपले नियोजित कार्यक्रम रद्द करत तातडीने मुंबईकडे रवाना झाल्याची माहिती आहे.




मुंबईत होणारी राष्ट्रवादी काँग्रेसची बैठक ही अत्यंत महत्त्वाची मानली जात असून, पक्षाची पुढील दिशा, अंतर्गत एकोपा आणि भविष्यातील राजकीय भूमिका यावर सविस्तर चर्चा होण्याची शक्यता आहे. अलीकडील घडामोडींमुळे पक्षात निर्माण झालेली अस्वस्थता, आमदारांची नाराजी आणि संभाव्य गटबाजी यावर तोडगा काढण्याचे आव्हान नेतृत्वासमोर आहे. या पार्श्वभूमीवर दिलीप वळसे पाटील यांची भूमिका निर्णायक ठरू शकते. शरद पवार आणि अजित पवार या दोन्ही नेतृत्वांशी त्यांचे जुने व विश्वासाचे संबंध असल्याने, ते समन्वयकाची भूमिका बजावू शकतात, अशी चर्चा राजकीय वर्तुळात आहे. त्यामुळेच प्रफुल्ल पटेल यांचा फोन आणि त्यानंतरची वळसे पाटील यांची तातडीची मुंबई भेट महत्त्वाची मानली जात आहे.


राष्ट्रवादी काँग्रेस पुन्हा एकत्र येण्याच्या चर्चांनाही जोर आला आहे. काही आमदार आणि नेत्यांकडून विठ्ठलाकडे म्हणजेच शरद पवारांच्या नेतृत्वाखाली परतण्याची इच्छा व्यक्त होत असल्याच्या चर्चा आहेत. त्यामुळे आजच्या बैठकीत पक्ष स्वतंत्रपणे पुढे जाणार की समन्वयाचा मार्ग स्वीकारणार, याबाबत संकेत मिळण्याची शक्यता आहे.

दरम्यान, महायुतीतील सत्ता समीकरणे, आगामी स्थानिक स्वराज्य संस्था व विधानसभा निवडणुकांची तयारी आणि पक्षाची संघटनात्मक पुनर्रचना या मुद्द्यांवरही आजच्या बैठकीत विचारमंथन होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. एकूणच, मुंबईतील या हालचाली राष्ट्रवादी काँग्रेससाठीच नव्हे, तर महाराष्ट्राच्या राजकारणासाठीही महत्त्वाच्या ठरणार आहेत.

# अजितदादा पवार यांच्या निधनाने महाराष्ट्राची मोठी हानी : कृषिराज उर्फ मनोज चौधरी

**उरुळी कांचन, ता. ३० :** अजित दादा पवार यांचे नेतृत्व हे महाराष्ट्राच्या राजकारणाला दिशा देणारे होते. त्यांच्या स्पष्टवक्तेपणाची, प्रशासनावर असलेल्या पकडीची आणि लोकहितासाठी घेतलेल्या धाडसी निर्णयांची उणीव कायम जाणवेल. राज्याच्या विकासासाठी त्यांनी घेतलेले निर्णय आजही मार्गदर्शक ठरतात. असे मत कृषिराज उर्फ मनोज दत्तात्रय चौधरी यांनी केले.

उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या आकस्मिक निधनाने संपूर्ण राज्यात शोककळा पसरली आहे. या दुःखद घटनेच्या पार्श्वभूमीवर शुक्रवारी (ता. ३०) सकाळी नायगाव (ता. हवेली) येथील ग्रामदैवत श्री काळभैरवनाथ मंदिरात शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पंचायत समितीचे उमेदवार कृषिराज उर्फ मनोज चौधरी बोलत होते.



यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसच्या कोरेगाव मूळ गटातील जिल्हा परिषदेच्या उमेदवार सुरेखा हरगुडे, कोरेगाव मूळ गणातील पंचायत समितीचे उमेदवार कृषिराज उर्फ मनोज चौधरी, राहुल चौधरी, बाबूशेठ केसकर, विजय चौधरी, बाळासाहेब आप्पा चौधरी, अमोल चौधरी विविध क्षेत्रांतील मान्यवर, स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. सभेच्या प्रारंभी उपस्थितांनी दोन मिनिटांचे मौन पाळून अजित दादा पवार यांच्या स्मृतींना आदरांजली वाहण्यात आली.

शोकसभेत उपस्थित वक्त्यांनी अजित दादा पवार यांच्या सार्वजनिक जीवनातील कार्याचा आढावा घेतला. सामान्य जनतेच्या प्रश्नांसाठी नेहमी तत्पर राहणारे, ग्रामीण विकासाला प्राधान्य देणारे आणि विकासाभिमुख धोरणे राबवणारे नेतृत्व म्हणून त्यांची ओळख होती, सिंचन, पायाभूत सुविधा, शेती आणि ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत करण्यासाठी त्यांनी केलेले प्रयत्न राज्याच्या इतिहासात उल्लेखनीय असल्याचेही अनेकांनी मत व्यक्त करीत आपल्या लाडक्या नेत्याला भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

दरम्यान, या प्रसंगी मान्यवरांनी अजित दादा पवार यांच्या कुटुंबीयांप्रती संवेदना व्यक्त केल्या तसेच त्यांच्या विचारांचा आणि कार्याचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचवण्याचा निर्धार व्यक्त केला. शांततेत आणि शिस्तबद्ध वातावरणात श्रद्धांजली सभेचा समारोप करण्यात आला.

# कायम वेळ पाळणाऱ्या दादांची नियतीने वेळ चुकवली : प्रशांत काळभोर

## लोणी काळभोर येथे सर्वपक्षीय श्रद्धांजली

**लोणी काळभोर, ता. ३० :** कायम वेळ पाळणाऱ्या अजित दादांची नियतीने वेळ चुकवली आहे. त्यामुळे महाराष्ट्राची पोकळी निर्माण झाली असून ती कधीही भरून न येणारी असल्याचे प्रतिपादन पुणे जिल्हा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक प्रशांत काळभोर यांनी केले.

उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या आकस्मिक निधनाने संपूर्ण राज्यात शोककळा पसरली आहे. या दुःखद घटनेच्या पार्श्वभूमीवर लोणी काळभोर (ता. हवेली) येथे सर्व राजकीय पक्षांच्या वतीने शुक्रवारी (ता. ३०) सकाळी दहा वाजता सर्वपक्षीय शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रशांत काळभोर बोलत होते.

यावेळी राष्ट्रवादीचे हवेली तालुकाध्यक्ष दिलीप वाल्हेकर, ज्येष्ठ नेते व साधना बँकेचे संचालक सुभाष आप्पा काळभोर, भाजपाचे किसान मोर्चाचे जिल्हाध्यक्ष प्रविण काळभोर, हवेली पंचायत समितीचे माजी उपसभापती सनी काळभोर, लोणी काळभोरचे सरपंच नागेश काळभोर, माजी सरपंच राहुल काळभोर, कदमवाकवस्तीचे माजी सरपंच नंदू काळभोर, युवराज काळभोर, आण्णासाहेब काळभोर, राजेंद्र काळभोर, कमलेश काळभोर, रमेश भोसले, संतोष भोसले, शितल कांबळे, रेश्मा काळभोर, अमोल टेकाळे, आदि सर्वपक्षीय मान्यवर यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हवेली तालुकाध्यक्ष दिलीप वाल्हेकर म्हणाले, उरुळी कांचन व लोणी काळभोर या ठिकाणी अजित दादांच्या दोन सभा आपल्या परिसरात घेण्याचे नियोजन सुरु होते. मात्र चर्चा असतानाच हि घटना समजली. त्यामुळे अतिशय दुख झाले. अजित दादांचे पूर्व हवेलीतील सर्वच नागरिकांवर प्रेम होते. अजित दादांचे स्मारक करावे अशी इच्छा आहे. सुख व दुखात सहभागी असलेला असा नेता पुन्हा होणे नाही.

दरम्यान, राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनाने पूर्व हवेली भागातील राष्ट्रवादी काँग्रेससह सर्वपक्षीय नेतेमंडळी व कार्यकर्ते हेलावले होते. सनी काळभोर, सुभाष काळभोर, नागेश काळभोर यांच्यासह अनेकांनी स्व. अजित पवार यांच्या आठवणींना उजाळा देत अनेकांना दुःख अनावर झाले. असा नेते पुन्हा होणे नाही, अशी भावनाही अनेकांनी व्यक्त करीत आपल्या लाडक्या नेत्याला भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

# लोणी काळभोरमध्ये भाजपचे कमळच फुलणार; युगंधर काळभोर यांचा ठाम विश्वास

**लोणी काळभोर, ता. ३० :** देशात पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या भक्कम व निर्णायक नेतृत्वाखाली भाजप सरकार जनतेच्या अपेक्षा पूर्ण करत आहे. केंद्र व राज्य सरकारने राबविलेल्या लोकाभिमुख, विकासाभिमुख आणि कल्याणकारी योजनांमुळे भाजपला जनतेचा अभूतपूर्व पाठिंबा मिळत असून, याच जोरावर लोणी काळभोर जिल्हा परिषद गट, कदमवाकवस्ती व लोणी काळभोर पंचायत समिती गणात भाजपचा विजय निश्चित आहे. असा ठाम विश्वास हवेली पंचायत समितीचे माजी उपसभापती सनी उर्फ युगंधर काळभोर यांनी व्यक्त केला आहे.

सनी काळभोर पुढे म्हणाले की, गेल्या काही वर्षांत भाजप सरकारने सर्वसामान्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणले आहेत. प्रधानमंत्री आवास व घरकुल योजना, उज्ज्वला गॅस योजना, शेतकरी सन्मान निधी, जलजीवन मिशन, दर्जेदार रस्ते, वीज व पाणीपुरवठा, आरोग्य सुविधा आणि शिक्षण क्षेत्रातील ठोस निर्णयांमुळे जनतेचा विश्वास भाजपवर अधिक मजबूत झाला आहे. हीच विश्वासाची भक्कम शिदोरी घेऊन भाजप या निवडणुकीत उतरली असून मतदारांकडून उत्स्फुर्त प्रतिसाद मिळत आहे.

लोणी काळभोर जिल्हा परिषद गटातून पूनम बाबुराव गायकवाड, लोणी काळभोरवडकी पंचायत समिती गणातून श्वेता कमलेश काळभोर, तर कदमवाकवस्ती पंचायत समिती गणातून ज्ञानेश्वर नामुगाडे हे भाजपचे अधिकृत



उमेदवार निवडणूक रिंगणात उतरले आहेत. तिन्ही उमेदवारांचा प्रभावी जनसंपर्क, पारदर्शक कार्यपद्धती आणि विकासाचा स्पष्ट दृष्टिकोन मतदारांच्या मनाला भावत असून, गावोगावी भाजपच्या विजयाची जोरदार चर्चा रंगली आहे. या गटात भाजप विरुद्ध राष्ट्रवादी अशी थेट लढत होत असली, तरी राष्ट्रवादीतील अंतर्गत गटबाजी, मतभेद आणि दिशाहीन नेतृत्व यामुळे त्यांची अवस्था बिकट झाली आहे. भाजपच्या संघटित आणि शिस्तबद्ध यंत्रणेसमोर विरोधकांची प्रचारयंत्रणा सपशेल अपयशी ठरत असल्याचे चित्र आहे. भाजप कार्यकर्ते बूथनिहाय नियोजन करून घराघरांत पोहोचत असून, विकास हाच प्रचाराचा केंद्रबिंदू आहे.

मतदारराजाचा कल स्पष्टपणे भाजपकडे झुकलेला असून, विकास हवा, स्थैर्य हवे आणि मजबूत नेतृत्व हवे ही भावना नागरिक उघडपणे व्यक्त करत आहेत. भाजप सरकारच्या कामगिरीपुढे विरोधकांकडे सांगण्यासारखे काहीही नसल्याने त्यांच्या गोटात अस्वस्थता आणि संभ्रमाचे वातावरण आहे. त्यामुळे विरोधकांचे धाबे दणाणल्याचे चित्र सर्वत्र दिसून येत आहे. असेही काळभोर यांनी सांगितले आहे.

दरम्यान, स्थानिक पातळीवर रस्ते, ड्रेनेज, पाणीपुरवठा, आरोग्य केंद्रे, शाळा आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर भाजप उमेदवारांनी ठोस व कृतीशील आराखडा मांडला आहे. फक्त आश्वासन नव्हे, तर प्रत्यक्ष काम हीच भाजपची ओळख असल्याचे मतदार ठामपणे सांगत आहेत. त्यामुळे लोणी काळभोर, कदमवाकवस्ती आणि लोणी काळभोर पंचायत समिती गणात भाजपच्या तिन्ही अधिकृत उमेदवारांचा विजय जवळजवळ निश्चित मानला जात आहे.

केंद्र व राज्यातील भाजप सरकारच्या कामगिरीचा थेट फायदा या निवडणुकीत होत असून, लोणी काळभोर परिसरात भाजपचा भगवा झेंडा फडकणार आहे. विरोधक भुईसपाट होत असताना, भाजप मात्र ऐतिहासिक विजयाच्या दिशेने वेगाने वाटचाल करत आहे.

## संक्षिप्त

### ठाकरे घराण्याबद्दल आक्षेपार्ह पोस्ट करणाऱ्याला कार्यकर्त्यांनी नग्न करून मारलं

**नालासोपारा, ता. ३० :** नालासोपारा येथून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. सोशल मीडियावर काही राजकीय नेत्यांविरोधात आक्षेपार्ह मजकूर पोस्ट केल्याच्या आरोपावरून एका तरुणाला मारहाण करण्यात आल्याचा व्हिडिओ सध्या मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. या घटनेमुळे परिसरात संतापाचे वातावरण निर्माण झाले असून कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न उपस्थित झाला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सूरज महेंद्र शिर्केअसे या तरुणाचे नाव आहे. गेल्या काही दिवसांपासून त्याने फेसबुकसह विविध सोशल मीडिया माध्यमांवर राज ठाकरे, उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरे यांच्याविरोधात अपमानास्पद आणि अश्लील भाषा वापरल्याचा आरोप आहे. या पोस्टमुळे संबंधित पक्षांचे कार्यकर्ते संतप्त झाले होते. घटनेच्या दिवशी मनसेचे काही पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना हा तरुण नालासोपारा परिसरात असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर काही कार्यकर्त्यांनी त्याचा शोध घेऊन त्याला पकडले. यावेळी तरुणाला मारहाण करण्यात आली. व्हायरल व्हिडिओमध्ये तरुणाला अर्धनग्न अवस्थेत रस्त्यावर ओढले जात असल्याचे दिसत असून ही दृश्ये अनेकांना अस्वस्थ करणारी आहेत. या घटनेनंतर मनसेचे उपविभागीय अध्यक्ष किरण नकाशे यांनी सोशल मीडियावर प्रतिक्रिया दिली. त्यांनी नेत्यांविरोधात अश्लील भाषा वापरणाऱ्यांना परिणाम भोगावे लागतील, असे मत व्यक्त केले. मात्र या प्रकारामुळे कायदा हातात घेण्याचा मुद्दा चर्चेत आला आहे.

### मध्यरात्रीच्या भयाण शांततेत आकाशातून आला भयानक आवाज

**पुणे, ता. ३० :** बुधवारी मध्यरात्री दीडच्या सुमारास जेव्हा संपूर्ण शहर शांत होते, तेव्हा अचानक आलेल्या प्रचंड आवाजांनी पुणेकरांची झोप उडवली. कोथरूडपासून लोहगावपर्यंत आणि विमाननगरपासून ते धानोरीपर्यंत अनेक घरांच्या खिडक्यांच्या काचा या आवाजाने हादरल्या. आकाशातून जाणाऱ्या शक्तिशाली लढाऊ विमानांच्या आवाजाने अनेकांच्या मनात भीती दाटली, 'हे युद्ध तर नाही ना?' असा प्रश्न सोशल मीडियावर वारंवार विचारला जाऊ लागला. भारतीय हवाई दलाची शान असलेली 'सुखोई- एमकेआय' ही विमाने लोहगाव विमानतळावरून आकाशात झेपावली होती. मध्यरात्रीच्या निवांत शांततेत या विमानांच्या इंजिनचा आवाज अनेक पटींनी मोठा जाणवला. विशेष म्हणजे, ही विमाने नेहमीपेक्षा कमी उंचीवर असल्याने आवाजाची तीव्रता इतकी होती की नागरिकांना घाम फुटला. ट्विटर आणि व्हॉट्सपवर अवघ्या काही मिनिटांत चर्चा सुरु झाल्या. कुणी याला आपत्कालीन स्थिती मानले, तर कुणी भविष्यातील संकटाची चाहूल. हवाई दलाच्या सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, ही एक 'रूटीन नाईट फ्लाइंग एक्सरसाइज' (नियमित रात्रीचा सराव) होता. शत्रूला चकवण्यासाठी रात्रीच्या अंधारात कमी उंचीवरून विमाने उडवण्याचे कसब वैमानिकांना अवगत असावे लागते.

# अजितदादांचा राजकीय वारसदार ठरवण्याचं पवार कुटुंबासमोर आव्हान

## सुनेत्रा पवार, प्रफुल्ल पटेल की सुनील तटकरे ?

**बारामती, ता. ३० :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनाने केवळ राज्याच्या राजकारणालाच नव्हे, तर राष्ट्रवादी काँग्रेस आणि पवार कुटुंबालाही मोठा धक्का बसला आहे. विशेष म्हणजे हे निधन अशा टप्प्यावर झाले, जेव्हा राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन्ही गट एकत्र येण्याच्या दिशेने हालचाली सुरू झाल्या होत्या. पुणे आणि पिंपरी चिंचवड महापालिका निवडणुका दोन्ही गटांनी एकत्र लढवल्या होत्या, तर आगामी जिल्हा परिषद निवडणुका घड्याळ या एकाच चिन्हावर लढवण्यावरही एकमत झाले होते. मात्र आता अजित पवार नसल्याने राष्ट्रवादीच्या भविष्यातील नेतृत्वाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

अजित पवार यांच्या पश्चात पक्षाची धुरा कोण सांभाळणार, यावर राजकीय वर्तुळात वेगवेगळे तर्क मांडले जात आहेत. पवार कुटुंबातील सदस्य, अजित पवारांसोबत पक्षफुटीत गेलेले सहकारी आणि दोन्ही गटांना मान्य असलेले नेते यांच्याभोवती ही चर्चा फिरत आहे. अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांचे नाव थेट पर्याय म्हणून घेतले जात आहे. बारामतीत महिला गटांच्या माध्यमातून त्यांनी अनेक सामाजिक उपक्रम राबवले आहेत. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत त्यांचा पराभव झाला असला, तरी नंतर त्या राज्यसभेवर बिनविरोध निवडून आल्या. मात्र राज्यभरातील संघटनात्मक पकड आणि कार्यकर्त्यांशी थेट संपर्क ही त्यांची मर्यादा मानली जाते.



अजित पवारांचे पुत्र पार्थ पवार यांनाही वारसदार म्हणून पाहिले जाते. २०१९ मध्ये त्यांनी मावळ लोकसभा निवडणूक लढवली होती, मात्र त्यात त्यांना अपयश आले. संघटनात्मक अनुभव आणि राज्यव्यापी नेतृत्वाचा अभाव पाहता त्यांच्याकडे तात्काळ जबाबदारी देणे कठीण मानले जाते.

अजित पवारांचे निकटवर्तीय प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे, धनंजय मुंडे आणि छगन भुजबळ यांचीही नावे चर्चेत आहेत. प्रफुल्ल पटेल यांना राष्ट्रीय पातळीवरील अनुभव आहे, मात्र महाराष्ट्रातील जनाधार मर्यादित आहे. तटकरे कोकणापुरते प्रभावी मानले जातात. धनंजय मुंडेंना मराठवाड्यात पाठिंबा असला, तरी मागील वाद त्यांच्या आड येऊ शकतात. छगन भुजबळांकडे अनुभव असला, तरी वय आणि जुने वाद हे अडथळे ठरू शकतात.


या सगळ्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेससमोर सर्वात मोठा आणि अंतिम पर्याय म्हणजे शरद पवार. दोन्ही गटांना मान्य असलेले, वरिष्ठ नेत्यांशी वैयक्तिक संबंध असलेले आणि सहकार क्षेत्रावर प्रभाव असलेले शरद पवार नेतृत्व किंवा किमान मार्गदर्शक भूमिकेत पुढे येऊ शकतात. मात्र वयामुळे ते थेट सक्रिय राजकारणाऐवजी मार्गदर्शनाची भूमिका स्वीकारतील, अशी शक्यता अधिक आहे. एकूणच, दोन्ही राष्ट्रवादी गटांचे विलीनीकरण आणि सर्वांना मान्य होईल असे नेतृत्व उभे करणे, हेच सध्या पक्षासमोरचे सर्वात मोठे आव्हान आहे. हे आव्हान कोण पेलतो, याकडे आता संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

### प्रॉपर्टी टॅक्स कमी करण्याच्या आमिषाने दीड लाखांची फसवणूक

**पुणे, ता. ३० :** महापालिकेचा प्रॉपर्टी टॅक्स निम्मा करून देतो, उच्च अधिकाऱ्यांशी ओळख आहे, अशी थाप मारून एकाने हडपसर येथील रिक्षाचालकाची तब्बल १ लाख ५२ हजार रुपयांची आर्थिक फसवणूक केली आहे. तसेच बनावट ऑनलाईन पावत्या, बाऊन्स झालेले चेक आणि पैसे मागितल्यावर पोलिस ओळखींची धमकी देत जीवे मारण्याचा प्रकार समोर आला असून, या प्रकरणामुळे पुण्यातील दलालांचे साटेलोटे आणि सामान्य नागरिकांची लूट पुन्हा एकदा ऐरणीवर आली आहे.सोहेल समीर जमादार (गंगा विलेज सोसायटी, हांडेवाडी पुणे) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. याप्रकरणी रिक्षाचालक युनूस इकबाल खान (वय ५१, रा. सय्यदनगर, हडपसर) यांनी वानवडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

## आरोग्यदूत युवराज काकडे यांच्या राष्ट्रवादीत प्रवेशामुळे थेऊर गटात राजकीय समीकरणे बदलली

**लोणी काळभोर, ता. ३० :** लहानपणापासूनच आई-वडिलांनी दिलेल्या सामाजिक कार्याच्या संस्कारांचा वारसा जपत निरपेक्ष सेवेचा ध्यास घेतलेले आरोग्यदूत युवराज काकडे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केल्याने थेऊर पंचायत समिती गणातील राजकीय वातावरण तापले आहे. जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांची रणधुमाळी सुरू असतानाच काकडे यांच्या प्रवेशामुळे राष्ट्रवादीची ताकद लक्षणीयरीत्या वाढली असून विरोधकांच्या गोटात अस्वस्थता पसरली आहे.



युवराज काकडे यांनी केवळ राजकारणापुरते मर्यादित न राहता सामाजिक व आरोग्य क्षेत्रात केलेल्या कामामुळे पुणे जिल्ह्यात वेगळी ओळख निर्माण केली आहे. गरजू रुग्णांना तातडीची वैद्यकीय मदत मिळवून देणे, मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या माध्यमातून आर्थिक सहकार्य मिळवून देणे, तसेच विविध धार्मिक व सामाजिक संस्थांना निधी उपलब्ध करून देण्यात त्यांचा मोठा वाटा आहे. त्यांच्या पुढाकारामुळे अनेक गंभीर आजारग्रस्त रुग्णांचे प्राण वाचले असून नागरिकांमध्ये त्यांच्याविषयी विश्वासाचे नाते निर्माण झाले आहे.

थेऊर व परिसरात त्यांनी राबवलेल्या महाआरोग्य शिबिरांनी मोठी दखल घेतली आहे. या शिबिरांमध्ये हृदयरोग, किडनी, डोळे, स्त्रीरोग, कान-नाक-घसा, हाडांचे आजार, दंत तपासणी यांसह सर्वांगीण आरोग्य तपासण्या करण्यात आल्या. याशिवाय दिव्यांग बांधवांसाठी मोफत मॉड्युलर हात-पाय, कॅलिपर्स देण्याचा उपक्रम, अँप्युटीज, पोलिओग्रस्त, गँगरीन व डायबेटीक फुट रुग्णांसाठी मोठ्या प्रमाणावर सहाय्य उपलब्ध करून देण्यात आले. या कामामुळे काकडे हे आरोग्यदूत म्हणूनच ओळखले जाऊ लागले. राजकीय पातळीवरही युवराज काकडे यांनी मागील लोकसभा व विधानसभा निवडणुकांमध्ये सामान्य कार्यकर्ता म्हणून राष्ट्रवादीसाठी प्रामाणिकपणे काम केले आहे. त्यामुळे पक्षाशी त्यांचे नाते जुने व दृढ आहे. आता अधिकृतपणे पक्षात प्रवेश केल्याने राष्ट्रवादीच्या तिन्ही उमेदवारांची ताकद वाढली असून प्रचाराला नवी ऊर्जा मिळाली आहे.

थेऊर गणात राष्ट्रवादीकडून कोमल संदेश आव्हाळे, आव्हाळवाडी पंचायत समिती गणात सुषमा मुरकुटे आणि थेऊर गणात युवराज काकडे हे अधिकृत उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. काकडे यांच्या प्रवेशामुळे या गटातील राष्ट्रवादीचे पारडे जड झाले असून विजयाचा मार्ग अधिक सुकर झाल्याचे चित्र आहे.

एकूणच सामाजिक कार्यातून जनतेच्या मनात स्थान मिळवलेल्या युवराज काकडे यांच्या राष्ट्रवादी प्रवेशाने थेऊर गणातील राजकीय समीकरणे बदलली असून आगामी निवडणूक अधिक रंगतदार व निर्णायक ठरण्याची चिन्हे दिसत आहेत.

## पुण्यातील काही भागात १० दिवस पाणीपुरवठा विस्कळीत

**पुणे, ता. ३० :** पुणे शहरातील विश्रांतवाडी, विमाननगर आणि विमानतळ परिसरातील नागरिकांसाठी आगामी आठवडा कसोटीचा ठरणार आहे. रावेत येथील नाल्यातून जाणाऱ्या मुख्य जलवाहिनीला भगदाड पडल्याने या भागाचा पाणीपुरवठा पूर्णपणे विस्कळीत झाला आहे. दुरुस्तीचे काम पूर्ण होण्यासाठी किमान ८ ते १० दिवसांचा कालावधी लागण्याची शक्यता असल्याने पुणेकरांना आता पाण्याचे नियोजन करावे लागणार आहे.

पुणेमहापालिकेच्याचिखलीयेथील जलशुद्धीकरण केंद्राला पाणीपुरवठा करणारी ७०० मि.मी. व्यासाची ही मुख्य जलवाहिनी रावेत येथे फुटली आहे. ही वाहिनी थेट पवना बंधाऱ्यातून पाणी वाहून नेते. जलवाहिनीला लागलेल्या या मोठ्या गळतीमुळे दररोज हजारो लिटर पाणी वाया जात आहे. नाल्याच्या पात्रात दुरुस्तीचे काम करणे



तांत्रिकदृष्ट्या आव्हानात्मक असल्याने प्रशासनाला या कामासाठी मोठा कालावधी लागणार आहे.

विश्रांतवाडी: संपूर्ण परिसर आणि लगतच्या वस्त्या. विमाननगर: विमानतळ परिसर, संजय पार्क आणि वर्मशिल. कळस: माळवाडी, जाधववस्ती आणि म्हस्के वस्ती. बोपखेल: गणेशनगर आणि सभोवतालचा भाग. महापालिका सध्या इतर वाहिन्यांतून पाणी वळवण्याचा प्रयत्न करत आहे, परंतु मुख्य वाहिनी बंद असल्याने पाण्याचा दाब अत्यंत कमी असेल. दुरुस्तीचे काम दिवस चालू शकते, त्यामुळे इतर कामांसाठी पिण्याच्या पाण्याचा वापर टाळावा.

## भरधाव आलेल्या दुचाकीस्वाराची पादचाऱ्याला जोरदार धडक

**मुंबई, ता. ३० :** मुंबईतील अंधेरी पश्चिम परिसरात घडलेल्या एका अपघाताचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. फोर बंगलोज परिसरातील एका दुकानाच्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात ही घटना कैद झाली आहे. या व्हिडिओमुळे शहरातील रस्ता सुरक्षा आणि वाहनचालकांची जबाबदारी यावर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, एक पादचारी रस्ता ओलांडत असताना उजव्या बाजूने भरधाव वेगात आलेल्या दुचाकीस्वाराने त्याला जोरदार धडक दिली. धडकेनंतर पादचारी आणि दुचाकीस्वार दोघेही रस्त्यावर कोसळले. अपघात पाहताच आसपासच्या नागरिकांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन जखमी पादचाऱ्याला मदत करण्याचा प्रयत्न केला. मात्र काही क्षणातच दुचाकीस्वार कोणतीही मदत न करता तेथून पळून गेल्याचे सीसीटीव्ही फुटेजमध्ये स्पष्टपणे दिसून येते.

अपघातानंतर जखमी पादचाऱ्याला रुग्णालयात दाखल करण्यात आले. डॉक्टरांनी त्याच्या डोक्याला ९ टाके घातले असून इतर किरकोळ जखमांवर उपचार करण्यात आले आहेत. सुदैवाने त्याची प्रकृती सध्या स्थिर असल्याची माहिती आहे. सोशल मीडियावर शेअर करण्यात आलेल्या माहितीनुसार, संबंधित दुचाकीस्वाराचे वय अंदाजे १८ ते १९ वर्षे असावे, अशी शक्यता व्यक्त केली जात आहे. तो निळ्या रंगाची बजाज प्लॅटिना मोटारसायकल चालवत होता. मात्र फुटेजमध्ये वाहनाची नंबर प्लेट स्पष्ट न दिसल्याने आरोपीचा शोध घेणे कठीण झाले आहे. या घटनेमुळे मुंबईतील रस्त्यांवरील बेदरकार वाहनचालकांची समस्या पुन्हा एकदा समोर आली आहे. गर्दीच्या आणि वर्दळीच्या भागातही वेगाने वाहन चालवले जात असल्याने पादचाऱ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला आहे. अपघातानंतर मदत न करता पळून जाण्याची वृत्तीही चिंतेची बाब मानली जात आहे.

या प्रकरणी अद्याप पोलिसांकडून अधिकृत माहिती देण्यात आलेली नाही. मात्र सीसीटीव्ही फुटेज आणि सोशल मीडियावरील माहितीच्या आधारे दुचाकीस्वाराचा शोध घेण्याचे प्रयत्न सुरू होतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## शहरात दिवसाढवळ्या कोयता गँगचा धुमाकूळ; तरुणावर जीवघेणा हल्ला

**नाशिक, ता. ३० :** नाशिक शहरातील सिडको आणि अंबड परिसरात गेल्या ३ ते ४ दिवसांपासून गुन्हेगारी घटनांमध्ये वाढ झाल्याचे चित्र दिसत आहे. नगरपरिषद निवडणुकीनंतर पुन्हा एकदा शहरात गुंडगिरी आणि दहशतीच्या घटना समोर येऊ लागल्या आहेत. मंगळवारी रात्री अंबड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील खुटवड नगर परिसरात एका तरुणावर कोयत्याने हल्ला झाल्याची गंभीर घटना घडली आहे. या प्रकरणी अंबड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी चार जणांना ताब्यात घेतले आहे.

मंगळवारी रात्री श्रीपाद निवासी संकुलाच्या मुख्य गेटवर एक चारचाकी वाहन धडकले. आवाज ऐकून रहिवासी बाहेर आले असता त्यांनी वाहन बाजूला करून जखमींना मदत केली. मात्र वाहनाचा चालक घटनास्थळावरून पळून गेला. तपासात असे समोर आले की वाहनात १५ ते २० तरुण होते. हे तरुण नशेत असल्याचा संशय रहिवाशांनी व्यक्त केला. यानंतर ११२ हेल्पलाइनवरून पोलिसांना माहिती देण्यात आली.

पोलिस येण्यापूर्वीच वाहनातील तरुणांनी तलवारी, काठ्या आणि कोयते हातात घेऊन संकुल परिसरात दहशत निर्माण केली. या टोळीने किशोर मटाले नावाच्या तरुणावर कोयत्याने हल्ला करून त्याला जखमी केले आणि तेथून पळ काढला. जखमी किशोर मटाले याला पोलिसांनी रुग्णालयात दाखल केले असून त्याच्यावर उपचार सुरू आहेत.

घटनेची माहिती मिळताच सहाय्यक पोलीस आयुक्त सचिन बारी यांनी घटनास्थळाला तसेच अंबड पोलीस ठाण्याला भेट दिली. त्याच रात्री संशयितांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. चार जणांना ताब्यात घेऊन चौकशी सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. हल्ल्यामागील कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.

अंबड परिसर हा औद्योगिक भाग असल्याने येथे कामगारांची मोठी वस्ती आहे. किरकोळ वादातून अनेकदा हिंसक घटना घडत असल्याचे दिसून येते. अलीकडेच त्रिमूर्ती चौक परिसरात सुमारे २० जणांच्या टोळीने वाहनांची तोडफोड केली होती. या प्रकरणात काही अल्पवयीन मुलांचाही सहभाग असल्याचे समोर आले असून पोलिसांनी त्यांनाही ताब्यात घेतले आहे. शहरातील वाढती गुन्हेगारी नागरिकांसाठी चिंतेचा विषय ठरत आहे.

## महामार्गावर ट्रकच्या धडकेत दोन महिलांचा अपघात; परिसरात तणाव

**छत्रपती संभाजीनगर, ता. ३० :** छत्रपती संभाजीनगर शहरातील धुळे महामार्गावर वाळूज परिसरात मंगळवारी संध्याकाळी भीषण अपघात झाला. भरधाव वेगाने येणाऱ्या एका ट्रकने दिलेल्या धडकेत दोन महिलांचा जागीच मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली असून नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

अपघातात मृत्युमुखी पडलेल्या महिलांची ओळख अनुसया लालसिंग चव्हाण वय ४२, रा. दारात, ता. उमरखेड, जि. यवतमाळ आणि वंदना नागोराव चव्हाण वय ३५, रा. बोधडी, ता. किनवट, जि. नांदेड अशी झाली आहे. दोन्ही महिला वाळूज परिसरातून जात असताना धुळे महामार्गावर हा अपघात घडला. ट्रकचा वेग प्रचंड असल्याने धडक अतिशय




जोराची होती आणि दोघींचा जागीच मृत्यू झाला.

घटना घडताच स्थानिक नागरिकांनी तातडीने पोलिस आणि आपत्कालीन सेवांना माहिती दिली. माहिती मिळताच वाहतूक शाखेचे पीआय राजेश यादव, पीएसआय शंकर शिरसाट, वाळूज एमआयडीसी पोलीस ठाण्याचे पीआय विनोद अबुज यांच्यासह पोलीस अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी तात्काळ परिस्थिती नियंत्रणात आणत मृत महिलांना रुग्णालयात दाखल केले. मात्र डॉक्टरांनी तपासणीनंतर त्यांना मृत घोषित केले. त्यानंतर दोन्ही मृतदेह शवविच्छेदनासाठी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात पाठवण्यात आले.

अपघातानंतर ट्रक चालक घटनास्थळावरून फरार झाला आहे. या प्रकरणी वाळूज एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांकडून तपास सुरू आहे. फरार चालकाचा शोध घेण्यासाठी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले जात आहे. या अपघातामुळे महामार्गावरील वेगवान वाहनांबाबत नागरिकांनी चिंता व्यक्त केली असून वाहतूक नियमांची कडक अंमलबजावणी करण्याची मागणी होत आहे.

## पहाटेच्या अंधारात चोरांचा थरार; लाखो रुपयांवर डल्ला मारला

**नाशिक, ता. ३० :** नाशिक जिल्ह्यातील इगतपुरी शहरात पहाटेच्या सुमारास धक्कादायक दरोड्याची घटना घडली आहे. गिरण दुकान परिसरातील एका बंद घराला चोरट्यांनी लक्ष्य केले. घरात कोणीही नसल्याची खात्री करून चोरट्यांनी मुख्य दरवाजा तोडून घरात प्रवेश केला. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

चोरटे घरात शिरल्यानंतर त्यांनी सर्व खोल्यांची झडती घेतली. पहिल्या मजल्यावर असलेल्या कपाटातील तिजोरीवर त्यांचे लक्ष गेले. कावळ्याच्या सहाय्याने त्यांनी तिजोरी जबरदस्तीने उघडली. त्यातून सुमारे ५ ते ५.५ तोळे सोने, अंदाजे १० तोळे चांदी आणि रोख रक्कम असा ऐवज चोरून नेण्यात आला. एकूण चोरीचा मुद्देमाल लाखो रुपयांचा असल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. चोरट्यांनी जाताना कपाटांची




तोडफोड केली तसेच दागिन्यांच्या पावत्याही सोबत नेल्याचे समोर आले आहे.

दरोडा टाकताना चोरट्यांनी शेजारील घरांचे दरवाजे बाहेरून बंद केल्याची माहिती आहे. त्यामुळे कोणीही बाहेर येऊ नये यासाठी त्यांनी ही खबरदारी घेतल्याचे दिसून येते. सकाळी शेजाऱ्यांना दरवाजे बाहेरून बंद असल्याचे लक्षात येताच त्यांनी आरडाओरडा केला. त्यानंतर पोलिसांना माहिती देण्यात आली आणि ही घटना उघडकीस आली.

इगतपुरी पोलीस तातडीने घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी पंचनामा करून पाहणी केली असून तपास सुरू केला आहे. प्राथमिक तपासात चोरटे अनुभवी असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. दरोड्याची आधीच योजना आखण्यात आली होती, असे संकेत पोलिसांना मिळाले आहेत. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले जात असून संशयितांची चौकशी सुरू आहे.

या घटनेनंतर परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. अनेकांनी घरांच्या सुरक्षेवर अधिक लक्ष देण्यास सुरुवात केली आहे. रात्री घर बंद ठेवून बाहेर जाताना काळजी घ्यावी तसेच कोणतीही संशयास्पद हालचाल दिसल्यास त्वरित पोलिसांना कळवावे, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

# लोणी काळभोर येथील एमआयटीच्या विद्यार्थिनीची खाजगी हॉस्टेलमध्ये आत्महत्या

**लोणी काळभोर, ता. ३० :** लोणी काळभोर येथील एमआयटी शैक्षणिक संकुलात मागील काही आठवड्यांपासून घडलेल्या सलग घटनांनी परिसरात खळबळ उडवून दिली असतानाच, गुरुवारी सायंकाळी आणखी एक गंभीर आणि मन सुन्न करणारी घटना समोर आली आहे. एमआयटीमध्ये बी.टेकचे शिक्षण घेणाऱ्या एका २१वर्षीय विद्यार्थिनीने लोणी काळभोर (ता. हवेली) येथील राहिंज वस्ती परिसरातील खाजगी हॉस्टेलमध्ये गळफास घेऊन आत्महत्या केल्याचा प्रकार गुरुवारी सायंकाळी साडेपाच वाजण्याच्या सुमारास उघडकीस आला आहे. या घटनेमुळे विद्यार्थी, पालक व नागरिकांमध्ये तीव्र चिंता व्यक्त केली जात आहे.

अतिशा राकेशकुमार मयंक (वय २१) असे आत्महत्या केलेल्या विद्यार्थिनीचे नाव असून, ती लोणी काळभोर येथील एमआयटी शैक्षणिक संकुलात बी.टेक अभ्यासक्रमाच्या शिक्षणात होती. मिळालेल्या माहितीनुसार, अतिशा ही लोणी काळभोर येथील राहिंज वस्ती परिसरातील अक्षदा गर्ल्स हॉस्टेलमध्ये वास्तव्यास होती. गुरुवारी सायंकाळी साडेपाच वाजण्याच्या सुमारास अतिशाच्या खोलीचा दरवाजा आतून बंद असल्याचे तिच्या मैत्रिणींच्या लक्षात आले. बराच वेळ आवाज देऊनही आतून कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने, मैत्रिणींनी तातडीने लोणी काळभोर पोलिसांना घटनेची माहिती दिली. या घटनेची माहिती मिळताच लोणी काळभोर पोलीस ठाण्याच्या पोलीस उपनिरीक्षक

### विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

लोणी काळभोर येथील एमआयटी शैक्षणिक संकुलात मागील काही दिवसांत घडलेल्या गंभीर घटनांनी विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. एका महिन्यापूर्वी विद्यार्थ्याच्या आत्महत्येची घटना, त्यानंतर भरधाव कारमुळे चिमुकल्याचा मृत्यू आणि आता बी.टेकच्या विद्यार्थिनीची खाजगी हॉस्टेलमध्ये आत्महत्या, या सलग घटनांमुळे संकुलातील सुरक्षाव्यवस्था, मानसिक समुपदेशन यंत्रणा आणि प्रशासनाची जबाबदारी यावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. विशेषतः खाजगी हॉस्टेलवर कोणतेही ठोस नियंत्रण नसणे, विद्यार्थ्यांच्या मानसिक तणावाकडे दुर्लक्ष होणे, तसेच आपत्कालीन परिस्थितीत तत्काळ मदतीची व्यवस्था अपुरी असल्याच्या तक्रारी वारंवार समोर येत आहेत. विद्यार्थ्यांचे मानसिक आरोग्य जपण्यासाठी समुपदेशन केंद्रे प्रभावीपणे कार्यरत आहेत का, याबाबतही संभ्रम आहे.

पूजा माळी, सहाय्यक फौजदार रामदास मेमाणे, महेंद्र आगळे व अन्य पोलीस कर्मचाऱ्यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. नागरिकांच्या सहाय्याने दरवाजा तोडण्यात आला. दरवाजा उघडल्यानंतर अतिशा ही खोलीत गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आली. पोलिसांनी तातडीने तिला खाली उतरवून उपचारासाठी लोणी काळभोर येथील विश्वराज हॉस्पिटलमध्ये दाखल केले. मात्र, डॉक्टरांनी तपासणीनंतर उपचारापूर्वीच तिचा मृत्यू झाल्याचे घोषित केले. अतिशाचा मृतदेह पोलिसांनी ताब्यात घेतला असून, शवविच्छेदनासाठी पुण्यातील रुग्णालयात पाठविण्यात येणार आहे. शवविच्छेदन अहवाल आल्यानंतर मृत्यूचे नेमकेकारण स्पष्ट होणार आहे. मात्र, अतिशाने टोकाचे पाऊल का उचलले, यामागे कोणते मानसिक, शैक्षणिक किंवा वैयक्तिक कारण होते का, याचा सखोल तपास लोणी काळभोर पोलीस करत आहेत. दरम्यान, सलग घडणाऱ्या घटनांमुळे एमआयटी शैक्षणिक संकुलातील विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा व मानसिक आरोग्याचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून, संस्थेच्या प्रशासनाने याबाबत ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी होत आहे.

पुणे प्राईम न्यूज
http://www.puneprimenews.com

# पुण्यातील खराडी येथील २ वर्षांच्या चिमुकल्याचा अपघातात मृत्यू




**पुणे, ता. ३० :** पुणे शहरातील खराडी परिसरात एक हृदयद्रावक घटना घडली असून, घरासमोर खेळणाऱ्या दोन वर्षांच्या चिमुकल्याचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. मयूर अमर माळवे असे या बालकाचे नाव आहे. पिकअप व्हॅनच्या चाकाखाली येऊन हा अपघात घडला आहे. या घटनेनंतर संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे. या दुर्दैवी घटनेनंतर माळवे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून आईच्या आक्रोशाने उपस्थितांचे डोळे पाणावले.

मिळालेल्या माहितीनुसार, गुरुवारी सायंकाळच्या सुमारास मयूर घरासमोरील मोकळ्या अंगणात खेळत होता. त्याची आई पूनम माळवे जवळच होती. परिसरात असलेल्या गोठ्यात दूध घेण्यासाठी एक पिकअप व्हॅन आली होती. वाहन चालकाने गाडी मागे घेत असताना आजूबाजूला खेळणाऱ्या मुलांकडे पुरेसे लक्ष दिले नाही. त्याच वेळी खेळण्यात रमलेला मयूर चालकाच्या लक्षात आला नाही आणि वाहनाचे चाक थेट त्याच्या अंगावरून गेले.

अपघात होताच मयूर रक्ताच्या थारोळ्यात पडला. हे दृश्य पाहून आईने एकच आक्रोश केला. स्थानिक नागरिकांनी तातडीने मदत करत मयूरला जवळच्या रुग्णालयात नेले. मात्र डॉक्टरांनी तपासणीनंतर उपचारापूर्वीच त्याचा मृत्यू झाल्याचे घोषित केले. या घटनेने संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.


विशेषम्हणजे काही दिवसांपूर्वीच खराडी परिसरात सोसायटीच्या आवारात वाहनाच्या धडकेत ५ वर्षांच्या मुलाचा मृत्यू झाला होता. ती घटना ताजी असतानाच पुन्हा एका निष्पाप बालकाचा जीव गेल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. लहान मुलांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

या प्रकरणी पोलिसांनी पिकअप व्हॅन चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे. मात्र कायदेशीर कारवाई होईल, पण माळवे कुटुंबाने आपला लाडका मयूर कायमचा गमावला आहे. या घटनेने निष्काळजी वाहनचालकांबाबत कठोर उपाययोजना करण्याची मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

# लोणी काळभोरमध्ये घड्याळाचाच गजर होणार : माजी सरपंच भोलेनाथ उर्फ चंदर शेलार

**लोणी काळभोर, ता. ३० :** जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुका या केवळ सत्तासंघर्षासाठी नव्हे, तर विकास, पारदर्शकता आणि लोकहितासाठीच झाल्या पाहिजेत. महाराष्ट्र राज्याचे लाडकेउपमुख्यमंत्री व पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांच्या आकस्मिक निधनाने संपूर्ण राज्य शोकसागरात बुडाले आहे. मात्र, हाच शोक आता राष्ट्रवादी काँग्रेससाठी संघर्षाची आणि विजयाची प्रेरणा ठरणार आहे. दादांना श्रद्धांजली म्हणून आणि त्यांच्या कार्यकर्त्यांवर असलेल्या विश्वासाचा मान राखण्यासाठी मतदारांनी घड्याळ या चिन्हालाच मतदान करावे, असे ठाम व आक्रमक आवाहन लोणी काळभोरचे माजी सरपंच भोलेनाथ उर्फ चंदर शेलार यांनी केले.





लोणी काळभोर जिल्हा परिषद गट, कदमवाकवस्ती व लोणी काळभोरवडकी पंचायत समिती गण हे राष्ट्रवादीचे पारंपरिक बालेकिल्ले मानले जातात. गेल्या अनेक वर्षांपासून या भागात विकासकामांचा धडाका, लोकाभिमुख निर्णय आणि मजबूत संघटन उभे राहिले आहे. त्यामुळे या निवडणुकीत राष्ट्रवादीचा विजय अटळ असून विरोधकांचे डावपेच निष्फळ ठरणार असल्याचा ठाम विश्वास शेलार यांनी व्यक्त केला.

या निवडणुकीत भाजप, राष्ट्रवादी, शिवसेना आणि अपक्ष उमेदवार रिंगणात असले तरी प्रत्यक्षात लढत ही राष्ट्रवादी विरुद्ध भाजप अशीच होणार आहे. अजित दादा आज आमच्यात शारीरिक रूपात नसले तरी त्यांनी आम्हाला लढण्याची ताकद, आत्मविश्वास आणि जिंकण्याची कला शिकवली आहे. त्यामुळे आम्ही केवळ लढणार नाही, तर भरघोष विजय मिळवून दाखवणार, असा निर्धारही त्यांनी व्यक्त केला.


लोणी काळभोर जिल्हा परिषद गटातून राष्ट्रवादीकडून शीतल सुजित कांबळे, लोणी काळभोरवडकी पंचायत समिती गणातून रेश्मा युवराज काळभोर तर कदमवाकवस्ती पंचायत समिती गणातून अमोल टेकाळे हे अधिकृत उमेदवार रिंगणात आहेत. अजितदादांनी आमच्यावर टाकलेला विश्वास हीच आमची खरी ताकद आहे. हा विश्वास आम्ही प्रचंड मताधिक्याने विजय मिळवून सार्थ ठरवू, असा विश्वास शेलार यांनी व्यक्त केला.

दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेसचा होम टू होम प्रचार जोरात सुरू असून नागरिकांचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळत आहे. घराघरांतून विकासकामांची पावती मिळत असून मतदारांमध्ये राष्ट्रवादीबद्दल सकारात्मक वातावरण निर्माण झाले आहे. विरोधक कितीही टीका, आरोप किंवा राजकीय हल्ले करो, हा गड राष्ट्रवादीचाच आहे. या गटात आणि गणात सत्ता पुन्हा राष्ट्रवादीचीच येणार, असा ठाम दावा करत शेलार यांनी निवडणूक रणशिंग फुंकले आहे.

दरम्यान, लोणी काळभोरमध्ये निवडणूक केवळ मतदानापुरती मर्यादित न राहता, अजितदादांच्या विचारांची, विकासाच्या वारशाची आणि राष्ट्रवादीच्या ताकदीची लढाई बनली आहे.

# पुण्यात निवृत्त मेजरची सव्वा कोटींची लूट; केअर टेकरने चेक चोरुन केल्या बनावट सह्या

**पुणे, ता. ३० :** पुण्यात ज्येष्ठ नागरिकांच्या विश्वासाचा गैरफायदा घेत फसवणूक केल्याचा अत्यंत धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. मुलबाळ कोणी नसल्याने काळजी घेण्यासाठी निवृत्त लष्करी अधिकाऱ्याने नेमलेलाच केअर टेकर त्यांच्या आयुष्याच्या साठवलेल्या कमाईवर डल्ला मारत तब्बल १ कोटी ११ लाख रुपयांची फसवणूक केल्याचे समोर आले आहे. या प्रकरणामुळे वृद्धांच्या सुरक्षिततेचा आणि केअर टेकर व्यवस्थेवरील विश्वासाचा प्रश्न गंभीरपणे उपस्थित झाला आहे.




मेजर बोमन इरुशॉ अमारिया (वय ८७, रा. पुण्यधाम वृद्धाश्रम, कोंढवा) हे निवृत्त लष्करी अधिकारी असून, वय आणि प्रकृतीच्या कारणामुळे ते वृद्धाश्रमात राहायला गेले होते. दैनंदिन गरजांसाठी त्यांनी केअर टेकर नेमला होता. मात्र, याच केअर टेकरने त्यांच्या एकटेपणाचा फायदा घेत इतर साथीदारांच्या मदतीने अमारिया यांचे धनादेश चोरले आणि बँकेतून परस्पर रक्कम काढली. मार्च २०२५ पासून आजपर्यंत बँक ऑफ इंडियाच्या कॅम्प शाखेतून ही फसवणूक सुरू असल्याचे तपासात उघड झाले आहे. संशयास्पद व्यवहार लक्षात आल्यानंतर अमारिया यांनी लष्कर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी सुप्रितसिंग भुपेंद्र कंडारिया (वय ३९, रा. माधव सोसायटी, कोथरूड) याला अटक केली असून केअर टेकर राज शहा आणि अन्य आरोपींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

प्राथमिक तपासात आरोपींनी धनादेशांचा गैरवापर करून मोठ्या रकमा काढल्याचे स्पष्ट झाले आहे. पोलिसांकडून आर्थिक व्यवहारांची सखोल चौकशी सुरू असून आणखी किती जण या फसवणुकीत सामील आहेत, याचा शोध घेतला जात आहे.

हा प्रकार केवळ आर्थिक फसवणूक नसून, ज्येष्ठ नागरिकांच्या असुरक्षिततेवर मारलेला घाव आहे. एकाकी वृद्धांची काळजी घेताना केअर टेकरची पार्श्वभूमी तपासण्याची गरज किती महत्त्वाची आहे, हे या घटनेतून पुन्हा अधोरेखित झाले आहे.

# पुण्यातील 'दारू माफिया' अखेर गजाआड; गावठी दारू विकणाऱ्याची कारागृहात रवानगी

**पुणे, ता. ३० :** पुण्यातील पाषाण परिसरात गावठी दारूच्या अवैध व्यवसायामुळे नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर राज्य उत्पादन शुल्क विभागाने कडक पाऊल उचलले आहे. पाषाण येथील लमाण तांडा परिसरात बेकायदा गावठी दारू तयार करून विक्री करणाऱ्या सराईत गुन्हेगारावर एमपीडीए अंतर्गत कारवाई करत त्याला थेट कारागृहात डांबण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी संबंधित आरोपीला एक वर्षासाठी नाशिक मध्यवर्ती कारागृहात स्थानबद्ध करण्याचे आदेश दिले आहेत.




थावरिया वाल्या पातलावत (वय ५३, रा. लमाण तांडा, पाषाण) असे या सराईत गुन्हेगाराचे नाव आहे. पातलावत गेल्या अनेक वर्षांपासून पाषाण आणि परिसरात गावठी दारू तयार करून तिची खुलेआम विक्री करत होता. या गावठी दारूच्या सेवनामुळे गंभीर आजार, अंधत्व तसेच जीवितहानीसारख्या घटना घडण्याची शक्यता असल्याने स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

राज्य उत्पादन शुल्क विभागाने यापूर्वीही पातलावतविरोधात अनेक वेळा कारवाई केली होती. गावठी दारू विक्रीप्रकरणी त्याच्याविरुद्ध आतापर्यंत ६ गुन्हे दाखल झाले होते. चांगल्या वर्तणुकीसाठी त्याच्याकडून बंधपत्रही घेण्यात आले होते. मात्र, या सर्व कारवायांनंतरही त्याने आपला अवैध व्यवसाय थांबवला नाही. वारंवार कायदा मोडून समाजाच्या सुरक्षिततेला धोका निर्माण होत असल्याने अखेर त्याच्यावर एमपीडीए अंतर्गत कठोर कारवाई करण्याचा निर्णय घेण्यात आला.

उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक अतुल कानडे यांच्या मार्गदर्शनाखाली या प्रकरणाचा सविस्तर प्रस्ताव तयार करण्यात आला. हा प्रस्ताव गुन्हे शाखेचे पोलीस उपायुक्त निखिल पिंगळे यांच्यामार्फत पोलीस आयुक्तांकडे पाठवण्यात आला. सर्व कागदपत्रांची पडताळणी केल्यानंतर पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी पातलावतला नाशिक कारागृहात स्थानबद्ध करण्याचे आदेश दिले.





Printed & Published By Janardan Gowardhan Dandge on behalf of Pune Prime News Network and printed at SHREE SAMARTH PRINTERS, 686, SHIVGANGA CHAMBERS, SHOP NO. G1, BUDHWAR PETH PUNE, 411002, Maharashtra. and publishded at Shop no 201, Sunrise Complex, Pune-Solapur Road. loni kalbhor(station), Tal.: Haveli Dist.: Pune-412201 Maharashtra) Editor- Janardhan Dandge (Mo. No. 9922232222).

मुद्रक, प्रकाशक व संपादक : जनार्दन गोवर्धन दांडगे. हे दैनिक पुणे प्राईम न्यूज नेटवर्क करीता मुद्रक आणि प्रकाशक जनार्दन गोवर्धन दांडगे यांनी श्री स्वामी समर्थ प्रिंटर्स, ६८६, शिवगंगा चेंबर्स, शॉप नं. जी १, बुधवार पेठ, पुणे - ४११००२ महाराष्ट्र येथे मुद्रित केले व पुणे प्राईम न्यूज नेटवर्क, शॉप नं २०१, सनराईज कॉम्प्लेक्स, पुणे सोलापूर रोड, लोणी काळभोर (स्टेशन), ता. हवेली, जि. पुणे- ४१२२०१ येथे प्रकाशित केले. 'पुणे प्राईम न्यूज' मधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. पुणे प्राईम न्यूज हे 'पुणे प्राईम न्यूज नेटवर्क'चे व्यापारचिन्ह आहे. (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी), दूरध्वनी : ९९२२२३२२२२, E Mail: puneprimenewsgmail.com.

**प्राईम लाईफ**

## घरगुती फेस पॅकने कपाळावरील सुरकुत्या दूर करा!



वृद्धत्वामुळे आणि त्वचेची योग्य काळजी न घेतल्याने त्याचा परिणाम चेहऱ्यावर स्पष्टपणे दिसून येतो. यामुळे चेहऱ्याची चमक कमी होते आणि त्वचा सैल होऊ लागते. त्याचबरोबर अनेक महिलांना कपाळावर सुरकुत्या येण्याची समस्या येऊ लागते. कपाळावर उमटणाऱ्या या रेषा सौंदर्य आणि डागाप्रमाणे काम करतात. अशा स्थितीत, जर तुम्ही देखील यामुळे त्रस्त असाल तर तुमच्यासाठी ३ खास घरगुती फेसपॅक घेऊन आलो आहोत. हे लावल्याने तुम्ही कपाळावर पडलेल्या या सुरकुत्यापासून मुक्त व्हाल आणि चेहऱ्यावर चमक आणण्यास मदत होईल.

१) कोको पावडर आणि ऑलिव्ह ऑईल फेसपॅक : कपाळावर दिसणाऱ्या या रेषा दूर करण्यासाठी तुम्ही कोको पावडर आणि ऑलिव्ह ऑईलचा फेस पॅक लावू शकता. यासाठी १-१ टेबलस्पून कोको पावडर आणि ऑलिव्ह ऑईल एका वाडग्यात मिसळा. मिश्रणाची एक गुळगुळीत पेस्ट बनवा आणि प्रभावित भागात किंवा संपूर्ण चेहऱ्यावर लावा. ते २० मिनिटे तसेच राहू द्या. नंतर ते स्वच्छ पाण्याने धुवा. काही दिवस सतत लागू केल्यानंतर तुम्हाला फरक जाणवेल

२) ऑलिव्ह ऑईल आणि मध फेस पॅक : कपाळावर दिसणाऱ्या रेषांपासून मुक्त होण्यासाठी तुम्ही ऑलिव्ह ऑईल आणि मध फेस पॅक वापरून पाहू शकता. हे तुमच्या कपाळावरील वाढलेल्या रेषा काढून चेहऱ्यावर चमक आणण्यास मदत करेल. यासाठी एका वाडग्यात १-१ चमचा ऑलिव्ह ऑईल आणि मध मिसळा. दोन्ही चांगले मिसळा आणि झोपण्यापूर्वी कपाळावर किंवा संपूर्ण चेहऱ्यावर लावा. रात्रभर तसेच राहू द्या.दुसऱ्या दिवशी सकाळी स्वच्छ पाण्याने चेहरा स्वच्छ करा. हा फेस पॅक आठवड्यातून २ ते ३ वेळा लावा. तुम्हाला काही दिवसात फरक दिसू लागेल.

३) गाजर आणि अंड्याचा फेस पॅक : गाजरात असलेले बीटा कॅरोटीन, आयोडीन नावाचे घटक सुरकुत्या कमी करण्यासाठी फायदेशीर मानले जातात. यासोबतच अंड्यांमध्ये असलेले पोषक घटक सैल त्वचा घट्ट करण्यास मदत करतात. अशा परिस्थितीत, कपाळावर उमटलेल्या या रेषा आणि सुरकुत्या काढून टाकण्यासाठी तुम्ही गाजर आणि अंड्याचा फेस पॅक लावू शकता. यासाठी एका वाडग्यात १ अंड्याचे पांढरे आणि किसलेले गाजर मिसळून चेहऱ्यावर २० मिनिटे लावा. नंतर ते स्वच्छ पाण्याने स्वच्छ करा. चांगले आणि लवकर परिणाम मिळविण्यासाठी, आठवड्यातून दोनदा ह्या फेस पॅक चा वापर करा.

# पुण्यातील तरुणाचा कोल्हापुरात गांजा तस्करीचा मोठा 'प्लॅन' फसला

### ८३ किलो गांजासह ३६ लाखांचा मुद्देमाल जप्त; राजारामपुरी पोलिसांचा थरारक सापळा

**पुणे, ता. ३० :** कोल्हापुरात अमली पदार्थांच्या तस्करीविरोधात मोठी कारवाई करत राजारामपुरी पोलिसांनी ८३ किलो गांजासह एका तस्कराला अटक केली आहे. कोकोपीठच्या नावाखाली हा गांजा विक्रीसाठी आणण्यात आला होता. या कारवाईत सुमारे २६ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, या प्रकरणामुळे पुणेकोल्हापूर मार्गावरील अमली पदार्थ तस्करीचे जाळे पुन्हा एकदा उघडकीस आले आहे.



समीर पापा शेख (वय ३४, रा. कात्रज, पुणे) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. मंगळवारी २७ जानेवारी रोजी सायंकाळी सरनोबतवाडी हद्दीतील राजाराम तलाव परिसरात ही कारवाई करण्यात आली. राजारामपुरी पोलिस ठाण्यातील उपनिरीक्षक सचिन चंदन यांना या परिसरात गांजाची विक्री करण्यासाठी एक व्यक्ती येणार असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचून संशयित टेम्पो अडवला. तपासणीदरम्यान टेम्पोमध्ये ८३ किलो गांजा आढळून आला, ज्याची किंमत सुमारे २० लाख ७८ हजार रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले.

चौकशीत समीर शेख याने हा माल पुण्यातील एका टेम्पो मालकाने दिल्याचे सांगितले. कोकोपीठ असल्याचे सांगून हा माल कोल्हापुरात आणण्यात आला होता. कोल्हापुरात पोहोचल्यानंतर माल घेणाऱ्या व्यक्तीचा पत्ता मोबाइलवर पाठवण्यात येणार होता, असेही त्याने पोलिसांना सांगितले. मात्र, त्याआधीच पोलिसांनी कारवाई केल्याने हा सौदा फसला. पोलिसांनी गांजासह टेम्पो आणि मोबाइल असा एकूण २६ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. विशेष म्हणजे, टेम्पो पकडल्यावर समीर शेखच्या मोबाइलवर एकाच नंबरवरून सलग ११ वेळा कॉल आल्याचे पोलिसांच्या लक्षात आले. ही व्यक्ती टेम्पोचा मालक किंवा तस्करीतील मुख्य सूत्रधार असण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे. संबंधित मोबाइल नंबरच्या आधारे आरोपीच्या साथीदारांचा शोध सुरू असून, या प्रकरणाचा तपास आणखी व्यापक पातळीवर केला जात असल्याची माहिती अपर पोलिस अधीक्षक डॉ. धीरजकुमार बच्चू यांनी दिली.

## भोसरीत जुन्या वादातून फरशीने तरुणाचं कपाळ फोडलं

**पिंपरी, ता. ३० :** औद्योगिक नगरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भोसरी परिसरात मंगळवारी रात्री 'पांचाळ हॉस्पिटल'सारख्या गजबजलेल्या परिसरात पूर्ववैम नस्यातून एका तरुणावर सिमेंटच्या फरशीने आणि लोखंडी रॉडने जीवघेणा हल्ला करण्यात आला. मिळालेल्या माहितीनुसार, पीडित तरुण आपल्या कामावरून परतत असताना आरोपींनी त्याला वाटेत अडवले. काही दिवसांपूर्वी झालेल्या किरकोळ वादामुळे संतापलेल्या आरोपींनी तरुणाला जमिनीवर पाडून लाथाबुक्क्यांनी अमानुष मारहाण केली. इतक्यावरच न थांबता, एका आरोपीने रस्त्यावरील जड सिमेंटची फरशी थेट त्याच्या कपाळावर मारली, तर दुसऱ्याने रॉडने वार करून त्याचे हात-पाय निकामी करण्याचा प्रयत्न केला. रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या तरुणाला सोडून आरोपींनी तेथून पळ काढला.

# दौंडमध्ये ३ ठिकाणी छापेमारी; साडेतीन हजार लिटर स्पिरीटसह १२ हजार बाटल्या जप्त

**दौंड, ता. ३० :** दौंड तालुक्यात बनावट दारूच्या धंद्यावर राज्य उत्पादन शुल्क विभागाने मोठा घाव घालत अवैध मद्यनिर्मितीचे संपूर्ण जाळे उघडकीस आणले आहे. २७ जानेवारी २०२६ रोजी एकाच दिवशी तीन ठिकाणी करण्यात आलेल्या धडक कारवाईत बनावट दारू बनवणारी फिरती फॅक्टरी, साठवणूक केंद्रे आणि वाहतूक यंत्रणा उद्ध्वस्त करण्यात आली. या कारवाईत तब्बल १२,६४२ बनावट दारूच्या बाटल्या, ३,५०० लिटर स्पिरीट, चार वाहने आणि दारू बनवण्याची यंत्रसामग्री असा एकूण ८५ लाख ४२ हजार ७६० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. दौंड अहिल्यानगर रोडवर मुंबईतील राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या



भरारी पथकाने एका आयशर टेम्पोची तपासणी केली असता, त्या टेम्पोमध्येच दारू तयार केली जात असल्याचे उघड झाले. चालत्या टेम्पोत स्पिरीट, स्वयंचलित बॉटलिंग मशीन आणि तयार बनावट दारू सापडली. या प्रकरणात धुळ्याचा रहिवासी सुनील प्रताप नगराळे याला अटक करण्यात आली. या कारवाईतच सर्वाधिक, म्हणजे जवळपास ५९ लाख ७५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

याच दिवशी दौंड विभागाच्या पथकाने पुणेसोलापूर रोडवरील पांढरेवाडी परिसरात छापा टाकून ट्रॅक्टर आणि ह्युंदाई कारमधून होणारी बनावट दारूची वाहतूक उधळून लावली. या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर देशी बनावट दारू सापडली. विजय जालिंदर झगडे याला अटक करण्यात आली, तर त्याचा साथीदार सोमनाथ नांदखिले फरार झाला होता. पुढील तपासात गार गाव परिसरातील एका शेताजवळील वीटभट्टीजवळ लपवून ठेवलेला आणखी दारूचा साठा सापडला आणि तेथून सोमनाथ नांदखिले यालाही अटक करण्यात आली.

या तिन्ही कारवायांत एकूण ३,५०० लिटर स्पिरीट, बनावट दारूच्या हजारो बाटल्या आणि वाहने जप्त करण्यात आली असून विजय झगडे, सुनील नगराळे आणि सोमनाथ नांदखिले या तिघांविरोधात स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. न्यायालयाने तिघांनाही कोठडी सुनावली आहे. या कारवाईमुळे दौंड तालुक्यातील बनावट दारूच्या व्यवसायाला मोठा धक्का बसल्याचे उत्पादन शुल्क विभागाकडून सांगण्यात आले आहे.

## अजित पवारांच्या रिक्त जागेवर वारसदार ठरला; दिल्लीतही होणार मोठी उलथापालथ

**मुंबई, ता. ३० :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अकाली निधनाने महाराष्ट्र आजही धक्क्यातून सावरलेला नाही. मात्र, राजकारणाचे चक्र थांबत नाही. दादांच्या जाण्याने निर्माण झालेली राजकीय पोकळी भरून काढण्यासाठी आणि राष्ट्रवादी काँग्रेसचा (अजित पवार गट) बालेकिल्ला शाबूत ठेवण्यासाठी आता पवार कुटुंबातील वारसांनी कंबर कसली आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, पक्षात मोठ्या फेरबदलांची तयारी सुरू असून, सुनेत्रा पवार आणि पार्थ पवार यांच्या खांद्यावर नवी जबाबदारी दिली जाण्याची शक्यता आहे.

अजित पवार म्हणजे बारामतीचा चेहरा. त्यांच्या निधनामुळे बारामती विधानसभा मतदारसंघाची जागा रिक्त झाली आहे. हा मतदारसंघ पवार कुटुंबासाठी केवळ जागा नसून अस्मितेचा विषय आहे. त्यामुळे, पोटनिवडणुकीत अजितदादांचा वारसा पुढे नेण्यासाठी सुनेत्रा पवार यांना रिंगणात उतरवण्यावर पक्षात एकमत होत आहे. सुनेत्रा पवार सध्या राज्यसभेच्या खासदार आहेत, तरीही बारामतीचा गड राखण्यासाठी त्यांना विधानसभेत पाठवण्याचा पवित्रा पक्ष घेऊ शकतो.

पार्थ पवार यांच्या राजकीय पुनरागमनासाठी 'टर्निंग पॉईंट' ठरू शकतो. जर सुनेत्रा पवार विधानसभा लढवण्यासाठी राज्यसभेचा राजीनामा देतात, तर त्यांच्या रिक्त जागेवर पार्थ पवार यांची वर्णी लागण्याची दाट शक्यता आहे. लोकसभा निवडणुकीतील पराभवानंतर पार्थ पवार सक्रिय राजकारणात काहीसे बॅकफुटवर होते. आता त्यांना थेट राज्यसभेवर पाठवून दिल्लीच्या राजकारणात 'लाँच' करण्याचा पक्षाचा मानस आहे.

## खंडणीखोरांच्या छळाला कंटाळून महिलेचा आत्मदहनाचा प्रयत्न

**पिंपरी-चिंचवड, ता. ३० :** पिंपरी-चिंचवड शहरात गुरुवारी एक धक्कादायक घटना घडली असून एका महिलेने पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालयाच्या इमारतीसमोर आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला. खंडणी आणि सततच्या त्रासाला कंटाळून तिने हे टोकाचे पाऊल उचलल्याची माहिती समोर आली आहे. या घटनेमुळे शहरात खळबळ उडाली असून पोलिसांकडून तातडीची कारवाई करण्यात आली आहे.




अनिता सागर लांडगे वय ५०, (राहणार लांडेवाडी भोसरी) असे या महिलेचे नाव आहे. त्या लांडेवाडी परिसरात ममता पान स्टॉल नावाचे छोटे दुकान चालवतात. मिळालेल्या माहितीनुसार, काही दिवसांपासून एक गुन्हेगार त्यांच्याकडे पैसे मागत होता आणि दुकान चालवायचे असल्यास मासिक हप्ता देण्याची धमकी देत होता. याच मानसिक दबावातून महिलेने पोलिस आयुक्तालयात जाऊन आत्मदहनाचा प्रयत्न केल्याचा दावा करण्यात येत आहे.

गुरुवारी सकाळी अनिता लांडगे या ज्वलनशील द्रवाची बाटली घेऊन आयुक्तालयात दाखल झाल्या. ड्युटीवर असलेल्या पोलिस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या ही बाब लक्षात येताच त्यांनी तातडीने हस्तक्षेप करून तिला थांबवण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्यानंतरही तिने स्वतःवर द्रव ओतल्याचे सांगितले जाते. पोलिसांनी प्रसंगावधान राखत तिला तात्काळ रोखले आणि मोठा अनर्थ टळला.

या प्रकरणी सार्वजनिक ठिकाणी गोंधळ निर्माण केल्याबाबत महिलेविरुद्ध चिंचवड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, अनिता लांडगे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार सचिन डॅनियल खालसे वय ४०, राहणार लांडेवाडी याच्याविरुद्ध एमआयडीसी भोसरी पोलिस ठाण्यात खंडणीचा गुन्हा नोंदवण्यात आला आहे. पोलिसांनी आरोपीला अटक केली असून पुढील तपास सुरू आहे.

## पुण्यातील व्यापारी ज्वेलर्सला जीवे मारण्याचा प्रयत्न

**पुणे, ता. ३० :** पुण्यातील कात्रज परिसरात एका ज्वेलर्सवर जीवघेणा हल्ला झाल्याची गंभीर घटना समोर आली असून, शहरातील व्यापाऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. दुकान बंद करून घरी जात असताना दुचाकीवरून आलेल्या तिघा चोरट्यांनी ज्वेलर्सला अडवून लोखंडी हत्याराने बेदम मारहाण केली. या हल्ल्यात ज्वेलर्स गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर सध्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत.



भरतसिंह मानसिंग जोधा राठोड (वय ४३, रा. सुखसागरनगर, कात्रज) असे जखमी ज्वेलर्सचे नाव आहे. अपर इंदिरानगर परिसरात त्यांचे दागिन्यांचे दुकान असून २७ जानेवारी रोजी रात्री सुमारे १० वाजण्याच्या सुमारास ते दुकान बंद करून घरी परतत होते. सुखसागरनगरमधील महाराणी साडी दुकानाजवळ पोहोचताच दुचाकीवरून आलेल्या तिघा अज्ञातांनी त्यांना अडवले. सुरुवातीला हाताने मारहाण करत अचानक लोखंडी हत्याराने त्यांच्या डोक्यावर आणि दोन्ही हातांवर वार करण्यात आले. रक्तबंबाळ अवस्थेत त्यांना रस्त्यावर टाकून आरोपी घटनास्थळावरून पळून गेले.

या घटनेनंतर परिसरात एकच खळबळ उडाली. जखमी अवस्थेत भरतसिंह राठोड यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यांच्या भावाने सोमसिंह मानसिंह जोधा राठोड (वय ४३) यांनी बिबवेवाडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून पोलिसांनी तिघा अज्ञातांविरोधात खुनाचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल केला आहे.

हा हल्ला चोरीच्या उद्देशाने करण्यात आला की वैयक्तिक वादातून, याचा तपास सुरू असून परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले जात आहे. व्यापाऱ्यांवर अशा प्रकारे उघडपणे होणारे हल्ले चिंताजनक असून, रात्रीच्या वेळेस सुरक्षेची ठोस व्यवस्था करण्याची मागणी स्थानिकांकडून केली जात आहे. पोलीस निरीक्षक सुरज बेंद्रे या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

## मुलीसोबत मैत्री केल्याच्या संशयातून एका १५ वर्षाच्या मुलाची हत्या

**पुणे, ता. ३० :** पुण्यातील कोथरूड परिसरातून एक धक्कादायक आणि मन हेलावून टाकणारी घटना समोर आली आहे. मुलीसोबत मैत्री केल्याच्या संशयातून तीन अल्पवयीन मुलांनी आपल्या वयाच्याच एका मुलाची निर्घृण हत्या करून त्याचा मृतदेह नदीत फेकून दिल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणामुळे अल्पवयीन मुलांमधील वाढती हिंसा, सोशल मीडियाचा गैरवापर आणि भावनिक असंतुलन यावर गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत.

पीडित अल्पवयीन मुलगा मंगळवारी घरी परत न आल्याने त्याच्या आईने अलंकार पोलीस ठाण्यात बेपत्ता असल्याची तक्रार दाखल केली. तपासादरम्यान महत्त्वाचा धागा कुटुंबालाच मिळाला. हा मुलगा त्याच्या आईच्या मोबाइलवरून सोशल मीडिया अकाऊंट वापरत होता. त्याचा प्रोफाइल तपासला असता एका मुलीकडून आलेला मेसेज दिसून आला आणि त्याच मेसेजनंतर मुलगा गायब झाल्याचे स्पष्ट झाले. ही माहिती तात्काळ पोलिसांना देण्यात आली.

पोलिसांनी संबंधित मुलीचा शोध घेतला असता, तिने असा कोणताही मेसेज पाठवलेला नसल्याचे निष्पन्न झाले. यानंतर प्रो' इल ॲक्टिव्हिटीचा सखोल तपास करण्यात आला. त्यावेळी मुलीचे नाव आणि फोटो वापरून बनवलेले फेक अकाऊंट समोर आले. हे अकाऊंट केवळ मुलाला घराबाहेर बोलावण्यासाठी तयार करण्यात आल्याचा संशय पोलिसांना आला. तांत्रिक तपासात हे फेक प्रोफाइल एका १५ वर्षांच्या मुलाने तयार केल्याचे उघड झाले. त्याला ताब्यात घेतल्यानंतर त्याने दोन मित्रांच्या मदतीने हत्या केल्याची कबुली दिली. आरोपीच्या म्हणण्यानुसार, प्रजासत्ताक दिनाच्या दिवशी मुलाला भेटीस बोलावण्यात आले. डेक्कन परिसरातील मुठा नदीकाठच्या निर्जन ठिकाणी नेऊन दगडाने ठेचून त्याची हत्या करण्यात आली आणि मृतदेह नदीत फेकण्यात आला.

बुधवारी उशिरापर्यंत पुणे पोलीस आणि अग्निशमन दलाने नदीत शोधमोहीम राबवली, मात्र मृतदेह सापडू शकला नाही. आरोपी आणि पीडित दोघेही कोथरूडचे रहिवासी असून आरोपी शाळा सोडलेला असून छोट्या कामांवर उदरनिर्वाह करत होता. वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनिता रोकडे यांनी या घटनेची माहिती दिली.

## निवडणूक आयोगाच्या निर्णयामुळे शिक्षकांपुढे मोठा पेच

**पुणे, ता. ३० :** नगरपालिका निवडणुकांनंतर लगेचच जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुका जाहीर झाल्याने निवडणूक कर्तव्यात गुंतलेल्या शिक्षकांची मोठी दमछाक सुरू आहे. त्यातच राज्य निवडणूक आयोगाच्या अलीकडील निर्णयामुळे शिक्षक अधिकच अडचणीत सापडले असून, त्यांच्या नोकरीवर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे राज्यात तीन दिवसांचा दुखवटा पाळण्यात येत आहे. या दुखवट्याचा थेट परिणाम सध्या सुरू असलेल्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांवर झाला असून, राज्य निवडणूक आयोगाने निवडणुका पुढे ढकलण्याचा महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. या निर्णयानुसार ५ फेब्रुवारी रोजी होणारे मतदान आता ७ फेब्रुवारीला होणार असून, ७ फेब्रुवारीऐवजी ९ फेब्रुवारीला मतमोजणी होणार आहे.

या तारखांतील बदलामुळे शिक्षकांसमोर गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. एकीकडे महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या दहावी-बारावीच्या प्रात्यक्षिक परीक्षा, तर दुसरीकडे जिल्हा परिषद व पंचायत समितीची निवडणूक ड्युटी या दोन्ही जबाबदाऱ्या एकाच कालावधीत आल्याने शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे. दोन्हीही कामे अत्यावश्यक सेवेत मोडत असल्याने नेमके प्राधान्य कशाला द्यावे, याबाबत शिक्षक गोंधळात पडले आहेत. वाढत्या कामाच्या ताणामुळे त्यांचे मानसिक स्वास्थ्यही बिघडू लागल्याचे चित्र आहे.

दरम्यान, ७ व ८ जानेवारी रोजी होणाऱ्या केंद्रीय शिक्षक पात्रता परीक्षा मुळे अडचण आणखी वाढली आहे. या तारखांमध्येच निवडणूक कर्तव्य लागल्यास CTET परीक्षेला उपस्थित राहायचे कसे, हा गंभीर प्रश्न शिक्षकांसमोर उभा ठाकला आहे.

या पार्श्वभूमीवर अनिल बोरनारे (अध्यक्ष, मुख्याध्यापक संघटना, उत्तर विभाग, मुंबई) यांनी राज्य निवडणूक आयोगाला पत्र पाठवले आहे. CTET परीक्षेचे प्रवेशपत्र सादर करणाऱ्या शिक्षकांना ७ व ८ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत निवडणूक कर्तव्यातून तात्पुरती सूट देण्यात यावी किंवा त्यांच्या ऐवजी पर्यायी कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी पत्राद्वारे केली आहे. निवडणूक प्रक्रियेतील बदल आणि शैक्षणिक जबाबदाऱ्यांचा एकाच वेळी आलेला ताण यामुळे शिक्षक वर्गात तीव्र अस्वस्थता पसरली असून, यावर तातडीने तोडगा काढण्याची गरज असल्याची मागणी होत आहे.

# नाशिकहून मुंबईला निघालेल्या किसान मोर्चाच्या प्रमुख मागण्या राज्य सरकाने केल्या मान्य

नाशिक, ता. ३० : नाशिकहून मुंबईच्या दिशेने निघालेल्या किसान मोर्चाला अखेर स्थगिती मिळाली असून, राज्य सरकारने आंदोलकांच्या प्रमुख मागण्या मान्य केल्याने शेतकरी आणि आदिवासी बांधवांना मोठा दिलासा मिळाला आहे. मागील काही दिवसांपासून शेकडो किलोमीटरची पायपीट करत शेतकरी, आदिवासी आणि कष्टकरी मुंबईकडे निघाले होते. वनहक्क, शेती, पाणी, वीज, शिक्षण आणि रोजगार अशा मूलभूत प्रश्नांवर सरकारने ठोस निर्णय घ्यावा, ही या मोर्चामागची मुख्य भूमिका होती.

मुंबईच्या वेशीवर येऊन पोहोचलेल्या आंदोलकांनी अंमलबजावणीची लेखी हमी मिळेपर्यंत आंदोलन मागे न घेण्याची ठाम भूमिका घेतली होती. किसान सभेच्या शिष्टमंडळाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासह मंत्रिमंडळातील सदस्यांशी सलग चर्चा केली. या चर्चांमध्ये बहुतांश मागण्यांना मान्यता देण्यात आली होती, मात्र प्रत्यक्ष अंमलबजावणीचा निर्णय होणे बाकी असल्याने आंदोलक थांबले होते.

दरम्यान, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनामुळे राज्यातील राजकीय आणि प्रशासकीय हालचाली ठप्प झाल्या. या पार्श्वभूमीवर नाशिक जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी भातसा फाटा येथे आंदोलकांची भेट घेऊन शासनाने घेतलेल्या निर्णयांची सविस्तर माहिती दिली. सर्व मागण्या मान्य असून, त्यासाठी तीन महिन्यांची कालमर्यादा निश्चित करण्यात आल्याचं स्पष्ट करण्यात आलं. त्यानंतर किसान सभेने परिस्थितीचं गांभीर्य लक्षात घेत आंदोलन स्थगित करण्याचा निर्णय घेतला.




वनाधिकार कायद्यांतर्गत सर्व दाव्यांची जिल्हानिहाय पुन्हा तपासणी, वनजमीन धारकांना शासकीय योजनांचा लाभ, पिकांची रास्त दराने खरेदी, आदिवासी भागातील पाणी स्थानिकांसाठी अडवणे, पेसा अंतर्गत भरती, शेतकऱ्यांना दिवसा वीज, शालेय पोषण आहार कर्मचाऱ्यांच्या मानधनवाढीपासून ते आदिवासी भागातील शिक्षण सुविधांपर्यंत अनेक महत्त्वाचे निर्णय या चर्चेत झाले आहेत.

आंदोलन स्थगित करताना शेकडो आंदोलकांनी दोन मिनिटांचे मौन पाळत अजित पवार यांना श्रद्धांजली वाहिली. अजितदादा अमर रहेच्या घोषणांनी परिसर भावूक झाला. कोणताही तणाव न निर्माण करता, शिस्तबद्ध पद्धतीने आंदोलक परतीच्या मार्गावर निघाले. हा मोर्चा केवळ मागण्या मान्य करून थांबलेला नसून, सरकारवर अंमलबजावणीचा दबाव कायम ठेवणारा एक महत्त्वाचा टप्पा ठरला आहे.